सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १५ जुलै २०१७.

## मीरा- भाईंदर महानगरपालिकेसाठी २० ऑगस्टला मतदान

## -राज्य निवडणूक आयुक्त

मुंबई, दि. १५: मीरा- भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० ऑगस्ट २०१७ रोजी मतदान होईल; तर २१ ऑगस्ट २०१७ रोजी मतमोजणी होईल. त्यासाठी आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे केली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, मीरा- भाईंदर महानगरपालिकेची मुदत २७ ऑगस्ट २०१७ रोजी संपत असल्याने तत्पूर्वी निवडणूक घेणे बंधनकारक आहे. एकूण २४ प्रभागातील ९५ जागांसाठी मतदान होणार आहे. नामनिर्देशनपत्रे २६ जुलै ते २ ऑगस्ट २०१७ या कालावधीत दाखल करता येतील. त्यासाठी संगणकीय प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. ३ ऑगस्ट २०१७ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल. नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याची अंतिम मुदत ५ ऑगस्ट २०१७ पर्यंत असेल. निवडणूक रिंगणातील अंतिम उमेदवारांना ७ ऑगस्ट २०१७ रोजी निवडणूक चिन्हे नेमून देण्यात येतील. २० ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी २१ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल. निकाल जाहीर झाल्यावर आचारसंहिता संपुष्टात येईल.

**मीरा भाईंदर एक दृष्टिक्षेप**

- एकूण लोकसंख्या- ८,०९,३७८
- मतदार (सुमारे)- ५,९३,३४५
- एकूण प्रभाग- २४
- एकूण जागा- ९५ (महिला ४८)
- सर्वसाधारण- ६४ (महिला ३२)
- अनुसूचित जाती- ४ (महिला २)
- अनुसूचित जमाती- १ (महिला १)
- नागरिकांचा मागास प्रवर्ग- २६ (महिला १३)

**जि.प. आणि पं.स. च्या रिक्त पदांसाठी मतदान**

अहमदनगर जिल्हा परिषदेच्या चांदेकासारे (ता. कोपरगाव) निवडणूक विभाग; तसेच पुणे जिल्ह्यातील खेड पंचायत समितीच्या पिंपरी बु. आणि अमरावती जिल्ह्यातील तिवसा पंचायत समितीच्या मोझरी निर्वाचक गणाच्या रिक्त पदासाठीदेखील २० ऑगस्ट २०१७ रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी संबंधित क्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे. ३१ जुलै ते ५ ऑगस्ट २०१७ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जातील. २० ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. २१ ऑगस्ट २०१७ रोजी मतमोजणी होईल, असेही श्री. सहारिया यांनी सांगितले.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)